**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील सरतपास विधिज्ञ श्री. व्ही. डी.पवार यांच्यामार्फत शपथेवर सुरु-**

मी माझे प्रतिज्ञापत्र शपथपत्र नि.क्र. ३९ येथे दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**उलटतपास गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे सरकारी वकिल श्री. के.डी. कोळपे यांच्यामार्फत**

हे म्हणणे खरे नाही की, भु-संपादन करतेवेळेस शासकिय अधिकारी, कर्मचारी यांनी आमच्या जमीनीत प्रत्यक्ष येऊन पाहणी करुन मोजणी व पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, भु-संपादन कायद्यानुसार आवश्यक त्या कलम ६, ९ आणि १२ च्या नोटिसा माझ्या वडिलांना तलाठी यांच्या मार्फत मिळाल्या होत्या. हे मला माहिती नाही की, माझ्या वडीलांनी प्रस्तुत प्रकरणात जमा नुकसान भरपाई उचलण्यापुर्वी आमच्या जमीनीच्या बाजारभाव मुल्य जास्त आहे हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा भु-संपादन अधिका-याकडे सादर केला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, शासनाने आमच्या जमीनीचा बाजारभावाप्रमाणे योग्य मावेजा आम्हाला दिला. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा आम्हाला कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आमची जमीन हलक्या स्वरुपाची व जिरायत होती. हे म्हणणे खरे नाही की, आमचे गाव छोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, भु-संपादन कायद्या कलम ४ च्या अधिसुचनेवेळेस आमच्या जमीनीचा बाजारभाव एकरी ३,४०,०००/- होता असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, भु-संपादीत जमीन वगळता आम्हाला आणखी जमीन शिल्लक आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा घरप्रपंच व्यवस्थीत चालु आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या खरेदीखतातील जमीन आमच्या जमीनीपेक्षा चांगल्या प्रतीची असून ती दुर अंतरावर आहे. आमची जमीन व खरेदीखतातील जमीन जवळच्या अंतरावर आहेत हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा आम्ही दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले खरेदीखत खोटे व पोकळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, जास्तीचा मावेजा मिळण्यासाठी आम्ही खोटा अर्ज देऊन मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दिले व आज खोटी साक्ष दिली.

एल.ए.आर. क्र. ३२१/२०२१
सुर्यभान वि. शासन व इतर
निशाणी क्र. ३९

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

RAHUL DATTATRAY DANGE

Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.03.12 11:27:43 +0530

ठिकाण - भूम.
दिनांक – १०/०३/२०२६.

(राहुल द. डांगे )
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,भूम.